महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
539, राजेंद्रनगर, कोल्हापूर-416 004.

दुरध्वनी क्र-0231-2696101/2/3 Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/इ.12वी/परीक्षा/ 2591
दिनांक : 22/07/2026
22 JUL 2026

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- जून-जुलै 2026 मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटप, गुणपत्रिका दुरुस्ती आणि श्रेणी सुधार योजने अंतर्गत (Class Improvement Scheme) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत जून-जुलै 2026 मध्ये झालेल्या माध्यमिक प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ गुणपत्रक तथा प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र आणि तपशिलवार गुण दर्शविणारे कनिष्ठ महाविद्यालयीन अभिलेख संबंधित वितरण केंद्रावर गुरुवार दि. 23/07/2026 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 पर्यंत हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे. तरी गुरुवार दि.23/07/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधीस पत्रासह वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी आणि विद्यार्थ्यांच्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व स्थालांतर प्रमाणपत्रांचे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात गुरुवार दि.23/07/2026 रोजी दुपारी 3.00 वाजता विद्यार्थ्यांना वाटप करण्यात यावे.

**अ) गुणपत्रिका स्वीकारण्याबाबत व वितरीत करण्याबाबत सूचना -**

1. सदर सर्व गुणपत्रिका व स्थलांतर प्रमाणपत्र आपल्याच माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका अथवा स्थलांतर प्रमाणपत्र प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरीत या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात.
2. आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका अथवा स्थलांतर प्रमाणपत्र प्राप्त न झालेस अथवा खराब छपाई असल्यास दि.31/07/2026 अखेर मंडळ कार्यालयास लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.
3. सर्व गुणपत्रिकांवर मा. विभागीय सचिव यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. गुणपत्रिकांवरील नोंदी उदा. विद्यार्थ्यांचे नाव,नावाचे स्पेलिंग व विषय इ.माहिती माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखावरुन बिनचूक तपासण्यात याव्यात. त्यानंतरच विद्यार्थ्यांस गुणपत्रिका वितरीत करण्यात यावी.

**ब) गुणपत्रिकांमधील दुरुस्तीबाबत सूचना -**

गुणपत्रिकांमध्ये काही त्रुटी असल्यास दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत (दि.23/08/2026 अखेर) मंडळ कार्यालयात समक्ष सादर करण्यात यावेत. दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत.

1. प्रती गुणपत्रिकेतील प्रत्येक चूकीच्या नोंदीसाठी रु.200/- आणि नवीन गुणपत्रिकेसाठी रु.200/- असे एकूण रु.400/- शुल्क भरावे लागेल.
2. माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरमधील संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद असलेल्या पानाची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली छायांकीत प्रत
3. दुरुस्ती यापूर्वीच म्हणजेच प्रिलिस्ट व प्रवेशपत्र प्राप्त झाल्यानंतर का कळविली नाही याबाबत संबंधित प्राचार्य व लिपिक यांचा मा. विभागीय सचिव यांच्या नावे वस्तुनिष्ठ खुलासा सादर करावा.

**क) श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांबाबत सूचना -**

1. जून-जुलै 2026 मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी दि. 23/08/2026 अखेर विकल्प देणे अनिवार्य राहिल. तसेच त्यानंतर पाच महिने प्रति महिना रु. 500/- जादा शुल्क आकारुन विकल्प स्वीकारता येईल. या कालावधीत विकल्प न दिल्यास जून-जुलै 2026 परीक्षेची संपादणूक रद्द करुन पूर्वीच्याच परीक्षेची संपादणूक ग्राह्य धरण्यात येईल.
2. विकल्पाचा नमुना फॉर्म या परिपत्रकासोबत जोडला आहे.
3. श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे शिफारस पत्रासह विकल्प फॉर्म आणि पूर्वीच्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र मंडळ कार्यालयास सादर केल्यानंतरच जून-जुलै 2026 ची मूळ गुणपत्रिका हस्तपोहोच देण्यात येतील याची नोंद घ्यावी.
4. विकल्प फॉर्म अथवा पूर्वीच्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका अभावी कोणत्याही विद्यार्थ्यास जून-जुलै 2026 ची मूळ गुणपत्रिका देण्यात येणार नाही अशी स्पष्ट सूचना सर्व विद्यार्थ्यांना देण्यात यावी.
5. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना जून-जुलै 2026 परीक्षेचा ऑनलाईन निकाल जून्या निकालासोबत तूलना करुन विकल्प फॉर्म भरण्याबाबत सूचना देण्यात याव्यात आणि ज्या विद्यार्थ्यांना जून-जुलै 2026 परीक्षेचा CIS चा निकाल स्वीकारावयाचा नाही अशा विद्यार्थ्यांकडूनही त्यापध्दतीने विकल्प फॉर्म भरून घेऊन तो शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी दि.23/08/2026 अखेर मंडळ कार्यालयात सादर करावा.

22.7.2026.

विभागीय सचिवांकरिता,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - श्रेणी सुधार योजने अंतर्गत (CIS) प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विकल्प फॉर्म नमूना.

प्रत माहितीस्तव,
सर्व वितरण केंद्र प्रमुख (माध्यमिक / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा),
जिल्हा - सातारा, सांगली, कोल्हापूर.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
### माध्यमिक (इ.10वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी ) श्रेणीसुधार योजना विकल्प फॉर्म

मी (विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनीचे नाव )------------------------------------------------------------ जून-जुलै 2026 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस श्रेणीसुधार योजनेअंतर्गत ------------------------------------या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालो/ झाले आहे. माझी जून-जुलै 2026 परीक्षेची संपादणुक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक ----------------------

| अ.क्र. | विषय | संपादन केलेले गुण |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | | |
| 6 | | |
| **एकूण गुण** | | |
| **टक्केवारी** | | |

मी यापूर्वी फेब्रु-मार्च/जून-जुलै----------------च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा------------------------------------------------ --- या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालो/झाले आहे. त्या परीक्षेची संपादणूक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक ----------------------

| अ.क्र. | विषय | संपादन केलेले गुण |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | | |
| 6 | | |
| **एकूण गुण** | | |
| **टक्केवारी** | | |

वरील दोन्ही परीक्षांचा तुलनात्मक विचार करता मी ( विद्यार्थ्यांचे / विद्यार्थीनीचे नाव ) ---------------------------------------- असे लिहुन देतो/देते की, माझे फेब्रु-मार्च/जून-जुलै ------------- च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील बैठक क्रमांक------------------- अन्वये दिलेल्या परीक्षेतील एकूण गुण व गुणांची टक्केवारी अधिक असल्याने त्या परीक्षेचा निकाल स्वखुशीने स्वीकारण्यास तयार आहे.

तसेच फेब्रु-मार्च/जून-जुलै------------- च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील बैठक क्रमांक------------------- अन्वये दिलेल्या परीक्षेतील एकूण गुण व गुणांची टक्केवारी कमी असल्याने त्या परीक्षेची संपादणुक रद्द करण्यास माझी संमती आहे.

विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे नाव -
विद्यार्थ्यांची/विद्यार्थीनीची स्वाक्षरी -

प्राचार्यांची स्वाक्षरी
कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का